# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.
दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www. mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय**

जा. क्र. मिभा / मनपा /सा.प्र./०२/२०२४ | दिनांक: ०२/०४/२०२४

## // परिपत्रक //

प्रतिवर्षाप्रमाणे शासकीय परिपत्रकाप्रमाणे **रविवार दि. १४ एप्रिल २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती** साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा माळा येथे सकाळी १०.०० वाजता **मा.श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), आयुक्त तथा प्रशासक** यांच्या शुभहस्ते व मा.अति.आयुक्त-१, मा.अति.आयुक्त-२, उपायुक्त (सर्व), शहर अभियंता, नगरसचिव, अधिकारी/कर्मचारी वर्ग व पत्रकार यांच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानिमित्त सकाळी ०९.०० वा. काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास, एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) समोर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयांस सकाळी ०९.३० वाजता पुष्पहार अर्पण करणे. तदनंतर महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे समोरील प्रांगणात सकाळी ०९.४५ वा. छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयास व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

तसेच महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे सकाळी ठिक १०.०० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस **मा.श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), आयुक्त तथा प्रशासक** यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यांत येणार आहे.

02.4.2024

**(रवि पवार)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

\-----------------------
\-----------------------
\-----------------------